Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक २४ ] गुरूवार ते बुधवार, ऑगस्ट ५-११, २०२१/श्रावण १४-२०, शके १९४३ [पृष्ठे ८, किंमत : रुपये ८.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार - ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १११.

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७-०७-२०२१

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टिपीएस-२८२०-६९४-प्र.क्र. ९०-२०२०-नवि-३०.—

ज्याअर्थी, अमरावती शहराची सुधारित विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधले आहे) चे कलम ३१ नुसार, शासनाच्या नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२८९२-११८०-प्र.क्र. ९०-९२ (बी)-नवि-१३, दिनांक ४ डिसेंबर १९९२ अन्वये मंजूर केली असून ती दिनांक २५ फेब्रुवारी १९९३ पासून अंमलात आलेली आहे. (यापुढे " उक्त विकास योजना " असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौ. शेगाव, स. नं. ४९-२-ब (भाग) ०.८३ हे. आर. क्षेत्र (यापुढे " उक्त क्षेत्र " असे संबोधले आहे) हे कृषी विभागामध्ये दर्शविलेले आहे. (यापुढे " उक्त विभाग " असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, अमरावती महानगरपालिकेने (यापुढे " उक्त महानगरपालिकेने " असे संबोधले आहे) उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) मध्ये दिलेली वैधानिक पद्धती अनुसरून उक्त विकास योजनेतील उक्त विभागामधून वगळून "रहिवासी विभागात" समाविष्ट करणेबाबतचा फेरबदलाचा प्रस्ताव (यापुढे " उक्त प्रस्तावित फेरबदल " असे संबोधले आहे) शासनाच्या मंजुरीसाठी सादर केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशी केल्यानंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर, प्रस्तावित फेरबदल काही अटी व शर्ती सापेक्ष मंजूर करावा, असे राज्य शासनाचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, मौ. शेगाव, स. नं. ४९-२-ब (भाग) क्षेत्र ०.८३ हे. आर. क्षेत्राकरीता उक्त जमिनीच्या मालकांनी सन २०२०-२१ या वर्षातील बाजारमूल्य तक्त्यानुसार येणा-या उक्त जमीनीच्या एकूण रकमेच्या ५% दराने येणा-या अधिमूल्य रक्कमेपैकी शासनास देय असलेली अधिमूल्याची ५०% रक्कम रु. ९७,५२५, सहायक संचालक, नगर रचना, अमरावती शाखा, अमरावती यांच्या लेखाशिर्षामध्ये दिनांक ०२-०६-२०२१ रोजी जमा केली आहे. आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली अधिमूल्याची ५०% रक्कम रु. ९७,५२५, दिनांक ०४-०६-२०२१ रोजी अमरावती, महानगरपालिका यांच्या लेखाशिर्षामध्ये जमा केलेली आहे;

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ पोटकलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकाराचा वापर करुन उक्त विकास योजनेतील उक्त प्रस्तावित फेरबदलास खालील नमूद अटी व शर्ती सापेक्ष शासन मंजुरी देत आहे आणि त्यासाठी उपरोल्लेखित दिनांक ४ डिसेंबर, १९९२ ची अधिसूचना सुधारित करण्यात येत आहे;

" विकास योजना मंजुरीच्या अधिसूचनांच्या फेरबदल सूचीतील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे."

## नोंद

" मौजे, शेगाव स. नं. ४९-२-ब (भाग), ०.८३ हे. आर., क्षेत्र कृषी विभागातून वगळून खालील अटी व शर्ती सापेक्ष रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे. "

## अटी व शर्ती

**अट क्र. १ :–** प्रस्तावाधिन जागेचा विकास करताना १०% खुल्या जागेव्यतिरिक्त १०% सुविधा क्षेत्र प्रस्तावित करणे बंधनकारक राहील.

**अट क्र. २ :–** फेरबदलाखालील क्षेत्रात पायाभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी जमीन मालक/विकासकाची राहील.

**अट क्र. ३ :–** फेरबदलाखालील जमिनीत जर अभिन्यासात भूखंड पाडून विक्री करणे प्रस्तावित असेल तर अभिन्यासातील मूलभूत सुविधांचा विकास व भूखंड विक्रीसाठी खालीलप्रमाणे बंधने राहतील. आयुक्त, अमरावती महानगरपालिका, अमरावती यांनी सदर बाबींवर नियंत्रण ठेवावे.——

(अ) अभिन्यास अंतिम मंजूर झाल्यानंतर . . एकूण २५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील.

(ब) सुमारे ४०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर . . एकूण ५०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील.

(क) सुमारे ६०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर . . एकूण ७५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील.

(ड) सुमारे ८०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर . . एकूण ९०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील.

(इ) सुमारे १००% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर . . एकूण १००% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील.

तसेच, जर अभिन्यासात समुह गृहबांधणी योजना विकसित करावयाची असेल तर, आयुक्त, अमरावती महानगरपालिका, अमरावती, यांनी विहित केल्यानुसार सर्व मूलभूत सुविधा विकसित झाल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही ;

**अट क्र. ४ :–**वरील कोणत्याही अटींचे उल्लंघन झाल्यास रेखांकन व अकृषक परवानगी रद्द करण्यास पात्र राहील.

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणा-या भाग नकाशाची प्रत आयुक्त, अमरावती महानगरपालिका, अमरावती यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये नागरीकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात आली आहे.

सदरची अधिसूचना शासनाच्या **www.maharashtra.gov.in/Acts and Rules** या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**वीणा मोरे,**
अवर सचिव.

भाग १-अ (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ११२.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, Dated 27-07-2021.

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS-2820-694-CR-90-2020-UD-30.----

Whereas, the Revised Development Plan of Amravati City, District Amravati has been sanctioned by the Government u/s 31 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No.TPS-2892-1180-CR-90-92 (B)-UD-13, Dated the 4th December 1992 and it has come into force with effect from the 25th February 1993 (hereinafter referred to "as the said Development Plan");

And whereas, in the said Development Plan, land admeasuring 0.83 Ha. out of Survey No. 49/2/B (Part) of Mouja Shegaon, (hereinafter referred to "as the said land") is included in Agricultural Zone (hereinafter referred to as "the said Zone");

And whereas, Amravati Municipal Corporation (hereinafter referred to as "the said Corporation") after following all the legal formalities stipulated under Section 37 (*1*) of the said Act, has submitted to the Government for its sanction a proposal for modification to the said Development Plan, so as to delete the said land from the said Zone and include the same in "Residential Zone"(hereinafter referred to as "the proposed modification");

And whereas,after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, the Government is of opinion that the proposed Modification in the said Development Plan should be sanctioned with some terms and conditions ;

And whereas, the land owners of the said land have deposited Rs. 97,525/- towards the 50% Government share of 5% premium amount as per the rate of said land as prescribed in the Annual Statement of Rates (ASR) for the year 2020-21 in the Government Treasury *vide* chalan dt. 02-06-2021, through the Assistant Director of Town Planning, Amravati Branch, Amravati and the remaining 50% of the 5% premium amount of Rs. 97,525/- has been deposited with the Amravati Municipal Corporation, Amravati *vide* dt. 04-06-2021 ;

Now, therefore, in exercise of the power conferred on it under sub-section (*2*) of Section 37 of the said Act, the Government of Maharashtra hereby sanctions the said proposed Modification with the terms and conditions mentioned below and for that purpose amends the above said Modification dated the 4th December, 1992 as follows;

"in the Schedule of Modification appended to the Notification sanctioning the said Development Plan the following new entry shall be added after the last entry".--

*ENTRY*

"The land bearing S. No. 49/2/B(Part), Area 0.83 H. R. is deleted from the Agriculture Zone and land so released in included in the Residential Zone, subject to following terms and conditions."

*TERMS AND CONDITIONS*

*Condition No. 1 :* While developing the land in addition to 10% open space, it shall be mandatory to provide 10% amenitiy space.

*Condition No. 2 :* It shall be the responsibility of the land Owner/Developer to provide basic infrastructure facilities *in* respect of the land under modification.

*Condition No. 3 :* If the land is proposed to be developed by way of plotted layout then sale of plots under such layout shall be monitored by the Municipal Commissioner, Amravati Municipal Corporation in relation to develpment of basic amenities and infrastructure facilities as per the stages given below.—

| | | |
|---|---|---|
| (i) | After final approval of layout | Sale of 25% of total Plots shall be permissible. |
| (ii) | After completion of 40% of Civic Amenities | Sale of 50% of total Plots shall be permissible. |
| (iii) | After completion of 60% of Civic Amenities | Sale of 75% of total Plots shall be permissible. |
| (iv) | After completion of 80% of Civic Amenities | Sale of 90% of total Plots shall be permissible. |
| (v) | After completion of 100% of Civic Amenities | Sale of 100% of total Plots shall be permissible. |

If, Group Housing Scheme is proposed in the layout, then the occupancy certificate shall not be given unless basic infrastructure and amenities specified by the Commissioner, Amravati Municipal Corporation, Amravati and fully developed;

*Condition No. 4 :* In case of non-compliance of above conditions, Layout Approval and Non-agricultural permission shall be liable to be cancelled.

A copy of part plan showing the afore said sanctioned modification shall be shall be available in the office of the Commissioner, Municipal Corporation, Amravati during office hours on all working days for inspection of public for a period of one month.

This Notification shall also be published on the govt. website *www.maharashtra.gov.in/Acts & Rules.*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VEENA MORE,
Under Secretary.

**पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकाला प्रसिद्ध झालेली आहे.**

---

८

---

**शुक्रवार, जुलै ३०, २०२१/श्रावण ८, शके १९४३**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र. २४.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

प्रकरण क्रमांक १-जा. वै. कलम ९-अ २०२१-ढाणकी—

**वाचा :** (१) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९-अ.

(२) मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र मुंबई यांचे कडील परिपत्रक दि. ७ नोव्हेंबर, २०१९.

(३) सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसुचित जमाती तपासणी समिती, अमरावती यांचे प्रकरण क्र. Endt No.JC/TCSC/AMT/5/510/Ele/122019/160728 मधील आदेश दि. १६-०३-२०२१.

(४) मुख्याधिकारी नगर पंचायत ढाणकी यांचे पत्र जा.क्र./सा.प्र./का.अ./१७/२०२०/२०२१, दि. २८-०१-२०२१ आणि पत्र जा.क्र./सा.प्र./का.अ./९४/२०२०/२०२१ दि. ३१-०३-२०२१.

(१) प्रस्तुत प्रकरणात श्रीमती मंदाकिनी रामकृष्ण धार्मिक उर्फ सौ. मंदाकिनी दिलीप नंदनवार सदस्या, प्रभाग क्र. १२ नगर पंचायत ढाणकी, ता. उमरखेड, जि. यवतमाळ या सार्वत्रिक नगर पंचायत, ढाणकी निवडणुकीमध्ये दि. ३०-१२-२०१९ ला अनुसुचित जमाती (महिला) या प्रवर्गाच्या आरक्षित जागेवर निवडून आल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९-अ मध्ये नमूद १२ महीन्याच्या विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्याचे मुख्याधिकारी, नगर पंचायत, ढाणकी यांनी संदर्भ क्र. (४) चे दि. २८-०१-२०२१ चे पत्राद्वारे कळविले आहे. त्यावरून सदर प्रकरण सुरू करण्यात आले आहे.

(२) श्रीमती मंदाकिनी रामकृष्ण धार्मिक यांनी जात वैधता पडताळणी समिती, अमरावती यांचेकडे त्यांचा अनुसुचित जमाती या प्रवर्गातील हलबी या जातीची पडताळणी करणेबाबत दि. २५-०२-२०२० अर्ज सादर केला होता. सदर अर्जावर मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्रमांक २२११/२०२० मध्ये दि. ११-०९-२०२० ला दिलेल्या निर्देशाप्रमाणे मा. जात पडताळणी समिती यांनी दि. १६-०३-२०२१ ला निर्णय दिला आहे. त्यामध्ये श्रीमती मंदाकिनी रामकृष्ण धार्मिक यांनी त्या अनुसूचित जमाती या प्रवर्गातील हलबी या जातीचा केलेला दावा अवैध ठरविला आहे. तसेच मा. जात पडताळणी समिती यांनी सदर आदेशाद्वारे उपविभागीय अधिकारी, उमरखेड यांनी श्रीमती मंदाकिनी रामकृष्ण धार्मिक यांना हलबी या जातीचा अनुसूचित जमाती या प्रवर्गाबाबत दिलेला जातीचा दाखला हा रद्द केलेला आहे.

(३) प्रकरणात श्रीमती मंदाकिनी रामकृष्ण धार्मिक यांना या कार्यालयामार्फत दि. १४-०६-२०२१ ला नोटीस देण्यात आली वा त्याद्वारे त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी दि. १८-०६-२०२१ ला जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे समक्ष उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. दि. १८-०६-२०२१ ला प्रकरणात सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीस सौ. मंदाकिनी दिलीप नंदनवार उर्फ मंदाकिनी रामकृष्ण धार्मिक व मुख्याधिकारी, नगर पंचायत, ढाणकी उपस्थित होते.

(४) श्रीमती मंदाकिनी रामकृष्ण धार्मिक यांनी त्यांचे लेखी म्हणणे मांडले. यामध्ये त्यांनी असे नमूद केले की, त्या नगर पंचायत ढाणकीच्या सार्वत्रिक निवडणूक २०१९ मध्ये प्रभाग क्र. १२ मधून अनुसूचित जमाती (महिला) या प्रवर्गामधून निवडून आल्या आहेत. त्यांनी जात पडताळणी समिती, अमरावती यांचेकडे जात वैधता प्रमाणपत्र मिळणेकरीता प्रकरण दाखल केले होते. परंतु सदर प्रकरण लवकर निकाली काढत नसल्यामुळे त्यांनी रिट याचिका क्र. २२११/२०२० मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे याचिका दाखल करून डायरेक्शन मागीतले होते. मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी सदर प्रकरण ४ महीन्याच्या कालावधीत निकाली काढण्यासाठी समितीला ११ सप्टेंबर, २०२० रोजीच्या आदेशाने निर्देश दिले होते. परंतु ४ महीन्याच्या कालावधीत प्रकरणात निकाल न दिल्यामुळे त्यांनी अवमान याचिका क्र. २८/२०२१ दाखल केली. जात पडताळणी समिती, अमरावती यांनी त्यांचे प्रकरण १६ मार्च, २०२१ रोजीच्या आदेशाने निकाली काढले. त्यामध्ये श्रीमती मंदाकिनी रामकृष्ण धार्मिक यांचा हलबी या जातीचा अनुसुचीत प्रवर्गाचा दावा अवैध ठरविला आहे. जात पडताळणी समितीच्या निर्णयाविरूध्द त्यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. १५२७/२०२१ दाखल करून आव्हानीत केले आहे. श्रीमती मंदाकिनी रामकृष्ण धार्मिक यांनी सादर केलेले खुलास्यासोबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क. १५२७/२०२१ मध्ये दि. ३०-०३-२०२१ ला पारीत केलेल्या आदेशाची प्रत जोडली आहे. मा. उच्च न्यायालयाने याचिकाकर्ता श्रीमती मंदाकिनी रामकृष्ण धार्मिक यांनी केलेली अंतरिम स्थगनादेशाची मागणी दि. ३०-०३-२०२१ चे आदेशाद्वारे नामंजूर केलेली आहे. त्यामुळे या प्रकरणात जिल्हाधिकारी यांना नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९-अ नुसार व संदर्भ क्र. (२) नुसार प्राप्त अधिकारान्वये आदेश पारीत करण्यास प्रतिबंधीत करणारा स्थगनादेश किंवा निर्देश नाहीत.

(५) वरील सर्व वस्तूस्थितीवरून व रेकॉर्डवर उपलब्ध असलेले कागदपत्रावरून खालील बाबी स्पष्ट आहेत.

(अ) मंदाकिनी रामकृष्ण धार्मिक उर्फ सौ. मंदाकिनी दिलीप नंदनवार या नगर पंचायत ढाणकीच्या सार्वजनिक निवडणूक २०१९ मध्ये प्रभाग क्र. १२ मध्ये अनुसुचित जमाती (महिला) या प्रवर्गातून निवडून आलेल्या नगरसेवक आहेत.

(ब) त्यांनी नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९-अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे १२ महीन्याच्या मुदतीच्या आत त्यांची जात वैध असल्याबाबत जात पडताळणी समिती यांनी निर्गमित केलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत. कलम ९-अ मध्ये देण्यात आलेली १२ महीन्याची मुदत अनिवार्य व आज्ञार्थी (mandatory) आहे आणि ती मुदत संपलेली आहे.

(क) मंदाकिनी रामकृष्ण धार्मिक उर्फ सौ. मंदाकिनी दिलीप नंदनवार यांचा अनुसूचीत जमाती प्रवर्गातील हलबी या जातीचा दावा जात पडताळणी समिती यांनी दि. ३१-०३-२०२१ च्या आदेशाद्वारे अवैध ठरविलेला आहे. तसेच उपविभागीय अधिकारी, उमरखेड यांनी त्यांना दि. १७-०२-२०२० ला अनुसूचित जमाती या प्रवर्गातील हलबी या जातीचे दिलेले जात प्रमाणपत्र सुध्दा रद्द केले आहे.

वरील निष्कर्षावरून मी अमोल येडगे, जिल्हाधिकारी यवतमाळ मला मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी दि. ७ नोव्हेंबर, २०१९ च्या परिपत्रकाद्वारे (संदर्भ क्र. २) प्रदान केलेल्या अधिकारानुसार खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

क्रमांक नपप्र-कार्या ४-९८२-२०२१.—

मंदाकिनी रामकृष्ण धार्मिक उर्फ सौ. मंदाकिनी दिलीप नंदनवार, सदस्या, प्रभाग क्र. १२, नगर पंचायत ढाणकी, ता. उमरखेड, जि. यवतमाळ यांनी जात वैधता पडताळणी समितीने निर्गमित कलेले जात वैधता प्रमाणपत्र निवडणूक दिनांकापासून नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९-अ मधील विहीत मुदत १२ महीन्याच्या आत सादर न केल्यामुळे त्यांची दि. ३०-१२-२०१९ रोजी नगर पंचायत सदस्य म्हणून झालेली निवड भूतलक्षी प्रभावाने याद्वारे रद्दबातल करण्यात येत आहे आणि त्यांचे नगरसेवक हे पद रिक्त झाल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

प्रकरणातील आदेश संबंधितांना कळविण्यात यावा.

यवतमाळ : **अमोल येडगे,**

दिनांक २८ जुलै २०२१. जिल्हाधिकारी, यवतमाळ.

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र. २५.

प्रकरण क्रमांक २-जा. वै. कलम ९-अ २०२१/ढाणकी.—

**वाचा** : (१) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९-अ.

(२) मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र मुंबई यांचे कडील परिपत्रक दि. ७ नोव्हेंबर, २०१९.

(३) सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती तपासणी समिती, अमरावती यांचे प्रकरण क्र. Endt No.JC/TCSC/AMT/5/510/Ele/122019/160727 मधील आदेश दि. २६-०३-२०२१.

(४) मुख्याधिकारी नगर पंचायत ढाणकी यांचे पत्र जा.क्र./सा.प्र./का.अ./१७/२०२०/२०२१, दि. २८-०१-२०२१ आणि पत्र जा.क्र./सा.प्र./का.अ./११७/२०२१/२०२२, दि. २९-०४-२०२१.

(१) प्रस्तुत प्रकरणात रमेश लक्ष्मण पराते, सदस्य, प्रभाग क्र. १३ नगर पंचायत ढाणकी, ता. उमरखेड, जि. यवतमाळ या सार्वत्रिक नगर पंचायत, ढाणकी निवडणुकीमध्ये दि. ३०-१२-२०१९ ला अनुसूचित जमाती या प्रवर्गाच्या आरक्षित जागेवर निवडून आल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९-अ मध्ये नमूद १२ महिन्याच्या विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्याचे मुख्याधिकारी, नगर पंचायत, ढाणकी यांनी संदर्भ क्र. (४) चे दि. २८-०१-२०२१ चे पत्राद्वारे कळविले आहे. त्यावरून सदर प्रकरण सुरू करण्यात आले आहे.

(२) रमेश लक्ष्मण पराते यांनी जात वैधता पडताळणी समिती अमरावती यांचेकडे त्यांचा अनुसूचित जमाती या प्रवर्गातील हलबी या जातीची पडताळणी करणेबाबत दिनांक १३-०२-२०२० ला अर्ज सादर केला होता. सदर अर्जावर मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र. २२१२/२०२० मध्ये दिनांक १९-०९-२०२० ला दिलेल्या निर्देशाप्रमाणे मा. जात पडताळणी समिती यांनी दिनांक २६-०३-२०२१ ला निर्णय दिला आहे. त्यामध्ये रमेश लक्ष्मण पराते यांचा अनुसूचित जमाती या प्रवर्गातील हलबी या जातीचा केलेला दावा अवैध ठरविला आहे. तसेच मा. जात पडताळणी समिती यांनी सदर आदेशाद्वारे उपविभागीय अधिकारी, उमरखेड यांनी रमेश लक्ष्मण पराते यांना हलबी या जातीचा अनुसूचित जमाती या प्रवर्गाबाबत दिलेला जातीचा दाखला हा रद्द केलेला आहे.

(३) प्रकरणात रमेश लक्ष्मण पराते यांना या कार्यालयामार्फत दिनांक १४-०६-२०२१ ला नोटीस देण्यात आली व त्याद्वारे त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी दिनांक १८-०६-२०२१ ला जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे समक्ष उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. दिनांक १८-०६-२०२१ ला प्रकरणात सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीस रमेश लक्ष्मण पराते व मुख्याधिकारी, नगर पंचायत, ढाणकी उपस्थित होते.

(४) रमेश लक्ष्मण पराते यांनी त्यांचे लेखी म्हणणे मांडले. यामध्ये त्यांनी असे नमूद केले की, ते नगर पंचायत, ढाणकीच्या सार्वत्रिक निवडणूक २०१९ मध्ये प्रभाग क्र. १३ मधून अनुसूचित जमाती या प्रवर्गामधून निवडून आले आहेत. त्यांनी जात पडताळणी समिती, अमरावती यांचेकडे जात वैधता प्रमाणपत्र मिळणेकरीता प्रकरण दाखल केले होते. परंतु सदर प्रकरण लवकर निकाली काढत नसल्यामुळे त्यांनी रिट याचिका दिनांक २२१२/२०२० मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल करुन डायरेक्शन मागितले होते. मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी सदर प्रकरण ४ महीन्याच्या कालावधीत निकाली काढण्यासाठी समितीला ११ सप्टेंबर २०२० रोजीच्या आदेशाने निर्देश दिले होते. परंतु ४ महिन्याच्या कालावधीत प्रकरणात निकाल न दिल्यामुळे त्यांनी अवमान याचिका क्र. २७/२०२१ दाखल केली. जात पडताळणी समिती, अमरावती यांनी त्यांचे प्रकरण क्र. ३१ मार्च २०२१ रोजीच्या आदेशाने निकाली काढले. त्यामध्ये रमेश लक्ष्मण पराते यांचा हलबी या जातीचा अनुसूचित प्रवर्गाचा दावा अवैध ठरविला आहे. जात पडताळणी समितीच्या निर्णयाविरुद्ध त्यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.५४३४/२०२१ दाखल करून आव्हानीत केले आहे. रमेश लक्ष्मण पराते यांनी सादर केलेले खुलास्यासोबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क. ५४३४/२०२१ मध्ये दि. ०७-०४-२०२१ ला पारीत केलेल्या नोटीस बजावणीबाबतच्या आदेशाची प्रत जोडली आहे. सदर रिट याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने आज रोजी पर्यंत कोणताही अंतरिम आदेश किंवा स्थगनादेश याबाबत दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणात जिल्हाधिकारी यांना नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९-अ नुसार व संदर्भ क्र. (२) नुसार प्राप्त अधिकारान्वये आदेश पारीत करण्यास प्रतिबंधीत करणारा स्थगनादेश किंवा निर्देश नाहीत.

(५) वरील सर्व वस्तुस्थितीवरून व रेकॉर्डवर उपलब्ध असलेले कागदपत्रावरून खालील बाबी स्पष्ट आहेत.—

(अ) रमेश लक्ष्मण पराते हे नगर पंचायत ढाणकीच्या सार्वत्रिक निवडणूक २०१९ मध्ये प्रभाग क्र. १३ मध्ये अनुसूचित जमाती या प्रवर्गातून निवडून आलेले नगरसेवक आहेत.

(ब) त्यांनी नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९-अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे १२ महिन्याच्या मुदतीच्या आत त्यांची जात वैध असल्याबाबत जात पडताळणी समिती यांनी निर्गमित केलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत. कलम ९-अ मध्ये देण्यात आलेली १२ महिन्याची मुदत अनिवार्य व आज्ञार्थी (mandatory) आहे आणि ती मुदत संपलेली आहे.

(क) रमेश लक्ष्मण पराते यांचा अनुसूचित जमाती प्रवर्गातील हलबी या जातीचा दावा जात पडताळणी समिती यांनी दि. २६-०३-२०२१ च्या आदेशाद्वारे अवैध ठरविलेला आहे. तसेच उपविभागीय अधिकारी, उमरखेड यांनी त्यांना दि. २०-०९-२०१७ ला अनुसूचित जमाती या प्रवर्गातील हलबी या जातीचे दिलेले जात प्रमाणपत्र सुध्दा रद्द केले आहे.

वरील निष्कर्षावरून मी अमोल येडगे, जिल्हाधिकारी, यवतमाळ मला मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी दि. ७ नोव्हेंबर २०१९ च्या परिपत्रकाद्वारे (संदर्भ क्र. २) प्रदान केलेल्या अधिकारानुसार खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

क्रमांक : नपप्र-कार्या ४-९८४-२०२१.—

रमेश लक्ष्मण पराते, सदस्य, प्रभाग क्र. १३, नगर पंचायत ढाणकी, ता. उमरखेड, जि. यवतमाळ यांनी जात वैधता पडताळणी समितीने निर्गमित केलेले जात वैधता प्रमाणपत्र निवडणूक दिनांकापासून नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९-अ मधील विहीत मुदत १२ महिन्याच्या आत सादर न केल्यामुळे त्यांची दि. ३०-१२-२०१९ रोजी नगर पंचायत सदस्य म्हणून झालेली निवड भूतलक्षी प्रभावाने याद्वारे रद्दबातल करण्यात येत आहे आणि त्यांचे नगरसेवक हे पद रिक्त झाल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

प्रकरणातील आदेश संबंधितांना कळविण्यात यावा.

यवतमाळ :
दिनांक २८ जुलै २०२१.

**अमोल येडगे,**
जिल्हाधिकारी, यवतमाळ.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.